Adarsh Vidya Prasarak Sanstha's

# ADARSH COLLEGE OF ARTS AND COMMERCE
# KULGAON BADLAPUR

## 'स्वातंत्र्याचा अमृत मोहोत्सव' आणि ' हर घर तिरंगा' उपक्रम

## Report

दि. १७ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना The Legend of Bhagat Sing या चित्रपटाचे महाविद्यालयाच्या स्मार्ट रूममध्ये आयोजन करण्यात आले होते. तर खास करून विद्यार्थिनींची सुरक्षा लक्षात घेऊन कुलगांव-बदलापूर पोलीस स्टेशन व महाविद्यालयाच्या महिला विकास मंचच्या वतीने 'महिलांची सुरक्षितता' या विषयावर श्री. मिलींद पोंक्षे, मुंबई यांच्या व्याख्यानाचे आयोजनही महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. या व्याख्यानाच्या वेळी महाविद्यालयातील सुमारे ३४० विद्यार्थीनी उपस्थित होत्या. विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर रहावे यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर देशाप्रति विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमान व राष्ट्रप्रेम निर्माण करण्याच्या उद्देशाने वरील चित्रपटाचे आयोजन करण्यात आले होते. याच दरम्यान सकाळी ११.०० वाजता सामूहिक राष्ट्रगीतही घेण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांनी स्मार्ट रूममध्ये येऊन चित्रपट बघण्यासाठी जमलेल्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व सुमारे १५० विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मा. प्रभारी प्राचार्या, डॉ. संगीता पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संदीप भेले आणि ग्रंथपाल श्री. लक्ष्मीकांत सातपूते, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग यांनी परिश्रम घेतले.